दै. गोदातीर दि. ०५/०९/२०२४

# डीवायएसपी नायक यांच्या पथकाची कारवाई; साडेचार लाखांचा गुटखा जप्त



**नांदेड–** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन 'फ्लश आउट' मोहिमेंतर्गत शहर व जिल्ह्यात सर्वत्र कारवायांचा धडाका सुरू आहे. पोलीस अधीक्षकांनी नियुक्त केलेल्या पथकामार्फत तसेच स्थानिक गुन्हे शाखा आणि संबंधित ठाण्यांच्या पथकांकडून अवैध धंद्याविरुद्ध कठोर पावले उचलण्यात येत आहेत. यातच इतवारा उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या पथकाने इतवारा हद्दीत कारवाई करून साडेचार लाख रुपयांचा गुटखा व तंबाखू जप्त केला आहे. गुटखा साठवणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये साईनगर परिसरात वासेक शमीम सिद्दिकी मुद्दशीर मोहिमोद्दीन सिद्दिकी (वय ४०) हा आपल्या घरात गुटखा व सुगंधित तंबाखू जर्दा काळ्या बाजारात विक्री करण्यासाठी साठवत असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांना समजली. त्यांनी पथकाला सूचना देऊन संबंधित ठिकाणी कारवाई करण्याचे आदेश दिले. पथकाने वासेक सिद्दीकी याच्या घरात कारवाई करून प्रतिबंधित गुटखा तसेच तंबाखू जर्दा १४ पोते असा साडेचार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच वासेक शमीम सिद्दिकी याला अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध अंमलदार अर्जुन मुंडे यांच्या फिर्यादीवरून इतवारा ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, डीवायएसपी सुशीलकुमार नायक यांनी पथकाचे कौतुक केले.

दै. मराठवाडा नेता.

# साईनगर येथे ४ लाख ५० हजार रुपयांचा जर्दा जप्त

**नांदेड : (म नेता)**

इतवारा विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या गुन्हे शोध पथकातील कर्मचारी व इतवारा पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथक यांनी साईनगर येथे छापा टाकून ४ लाख ५० हजार रुपयांचा सुगंधी जर्दा जप्त केला असून इतवारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबतची सविस्तर माहिती अशी की, इतवारा भागातील साईनगर येथील एका घरात अवैध रित्या शासनाने बंदी घातलेला गुटखा व जर्दा साठविला असल्याची माहिती सूत्रांनी दिली. सदर माहिती पोलिस कर्मचारी अर्जुन मुंडे व पोलिस उपनिरीक्षक रमेश गायकवाड यांना मिळाली. सदर माहिती वरिष्ठांना कळवून त्यांच्या आदेशाने उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या गुन्हे शोध पथकातील कर्मचारी अर्जुन मुंडे, चंद्रकांत स्वामी, श्रीराम दासरे, समीर व इतवारा पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकांचे पोलिस उपनिरीक्षक रमेश गायकवाड, हाके, हबीब चाऊस, गायकवाड, जावेद आदी पोलिस कर्मचारी यांनी सापळा रचला. साईनगर येथील वासेक शमीम सिद्दीकी मुसादीक मोहियोदीन सिद्दीकी यांच्या घरी छापा टाकला. या छाप्यात पोलिसांना मोठ्या प्रमाणात जर्दा साठविला असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्यांची मोजदाद केली असता १८ पोत्यात ९०० पाकिट जर्दा साठविला असल्याचे दिसून आले. सदर जर्दाचे एका पुड्याची किंमत ५०० रुपये असल्याचे दिसून आले. पण पोलिसांनी सदर जर्दा जप्त केला असून आरोपी वासेक शमीम सिद्दीकी यांच्या विरोधात इतवारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. सदरील कारवाई पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक, पोलिस निरीक्षक रणजित भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या गुन्हे शोध पथकातील पोलिस कर्मचारी व इतवारा पोलिस ठाण्यांच्या गुन्हे शोध पथकातील पोलिस कर्मचारी यांनी संयुक्त कारवाई पार पाडली आहे.

नांदेड यांनी कौतुक केले आहे.